# प्रियदर्शिनी इंदिरा गांधी



डॉ.उमाकांत वानखेडे

# प्रियदर्शिनी इंदिरा गांधी

## जीवन आणि कार्य

**Editor**
**Dr. Wankhede Umakant**
(M.A. M.Phil.,Ph.D)

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra)

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

# प्रियदर्शिनी इंदिरा गांधी : जीवन आणि कार्य

© डॉ. उमाकांत वानखेडे
9421336952

❖ **Publisher :**
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**

❖ **Page design & Cover :**
Shaikh Jahuroddin,Parli-V

❖ **Edition:** December 2020

**ISBN** 978-93-85882-65-4

❖ **Price : 499/ -**

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, in this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at **Beed** (Maharashtra, India)

**http://www.printingarea.blogspot.com**

27) बँकांचे राष्ट्रीयीकरण आणि इंदिरा गांधी
**प्रा.धप्पाधुळे रामेश्वर शंकरराव, लोहारा, जि.उस्मानाबाद** ||93

28) बांगलादेश निर्मिती आणि इंदिरा गांधी : एक चिकित्सक अध्ययन.
**Dr. Sudarshan Venkatrao Sonavane,** Lohara Dist: Osmanabad ||95

29) इंदिरा गांधी यांचा वारसा
**डॉ.एल.बी.घुमरे, परळी वै. जि.बीड** ||98

30) इंदिरा गांधी : जीवन व कार्य
**प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव, बीड** ||100

31) इंदिरा गांधी यांचे जीवन व कार्य : एक अभ्यास.
**प्रा. कोटरंगे दत्ता नामदेव, लोहारा, जि.उस्मानाबाद** ||103

32) आयर्न लेडी इंदिरा गांधी
**प्रा.डॉ.लिंबोळे गणेश मनोहर,हाराबाद, जि.नाशिक** ||106

33) इंदिरा गांधी यांच्या कार्याचा भारताच्या सामाजिक व्यवस्थेवर झालेला परिणाम: एक अभ्यास
**प्रा.गायकवाड पी.के.,लोहारा जि.उस्मानाबाद** ||109

34) इंदिरा गांधी यांचे जीवन आणि कार्य
**प्रा.राहुल बी.सोनवणे, परळी-वै.** ||111

35) भारतातील कर्तबगार राजकीय महिला नेतृत्व-इंदिरा गांधी
**डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर, बीड** ||113

36) गुंगी गुडीया ते दुर्गा : एक राजकीय प्रवास
**प्रा.डॉ. आंधळे बी.व्ही., सोनपेठ जि. परभणी** ||117

37) इंदिरा गांधी यांचे जीवन कार्य
**प्रा.डॉ. संजय मगर, चिंचोली (लिं)जि. औरंगाबाद** ||118

38) इंदिरा गांधी एक कर्तबगार राजकीय महिला नेतृत्व : एक अभ्यास
**प्रा.डॉ. पी.व्ही. माने, लोहारा** ||121

39) इंदिरा गांधींचे परराष्ट्र धोरण, बांग्लादेशाची निर्मिती आणि आण्विक प्रश्न
**डॉ. अभिषेक चिमणकर, अमित वासुदेव गजभिये नागपूर** ||124


www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**ISBN** 978-93-85882-65-4

30

# इंदिरा गांधी : जीवन व कार्य

**प्रा.डॉ. जाधवर बापू देवराव**
(इतिहास विभाग प्रमुख)
बलभीम महाविद्यालय, बीड

**प्रस्तावना :-**

जगाच्या इतिहासाचा धांडोळा घेत असताना ज्ञात नसणाऱ्या अनेक गोष्टी समोर येतात. यामध्ये प्रामुख्याने समाजसुधारक, विचारवंत, लेखक, राजकीय विश्लेषक, तत्वेते, इतिहासकार इत्यादी यामध्ये समाजसुधारकांनी तत्कालीन स्थिती पाहुन प्रबोधनाच्या माध्यमातून जनमत जागृत करण्याचे महत्वाचे कार्य केले. त्यामुळे जागतिक स्तरावर सुधारकांचे नाव अजरामर राहिले. विचारवंतानी चिंतन मनन करून आपल्या अभ्यासपूर्ण विचारांची शिदोरी जनतेसमोर ठेवली. त्यामुळे त्यांच्या कार्याची नोंद झाली. लेखक वर्गाने समोर येऊन मत व्यकत न करता लिखानाच्या माध्यमातून कार्य केले. त्यामध्ये जगाच्या आणि देशाच्या जडणघडणीत त्यांचे योगदान अविस्मरणीय आहे. त्याचप्रमाणे राजकीय विश्लेषक तत्वेते आणि इतिहसकार यामध्ये इतिहसकारांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागले. कारण जगाच्या आणि देशाच्या पाठीवर ज्या काही चांगल्या वाईट घटना घडल्या. त्या सर्व घटनांच्या नोंदी इतिहास रुपाने ठेवण्याच्या मोठे काम जर कोणी केले असेल तर ते इतिहासकारांनी कारण व्यक्तीची कारकिर्द कितीही मोठी असेल तरी तिची ऐतिहासिक मांडणी करून लिखीत स्वरुपात जर जनतेसमोर आली नाही तर त्या राजकीय, सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीचे मोठेपण आणि काम जनतेला माहित होत नाही आणि त्यामुळे त्या व्यक्तीची उंची कार्य करून पण अनभिज्ञ होऊन जाते. त्यामुळे इतिहासकारांना सुध्दा महत्वाचे स्थान प्राप्त होते. मग ते जगातील पातळीवर असो किंवा देश पातळीवर असो.

वरील विषयाच्या अनुषंगाने शोध निबंधाचे लिखान करत असताना जागतिक पातळीवरील काही गोष्टींचा उल्लेख आलेला असेल तरी प्रामुख्याने येथे देशपातळीवर घडलेल्या घटना आणि कार्य केलेल्या व्यक्ती यांचाच उल्लेख अग्रक्रमाने येथे करण्यात आलेला आहे. देशाच्या अनुषंगाने विचार करता जगातील प्रत्येक देशात कमी जास्त प्रमाणात वेगवेगळ्या चळवळी आंदोलने, राजकीय उलथापालथी घडून आलेल्या असतात. या सर्व घटना ज्या घडतात त्या घडवण्यासाठी एखादे नेतृत्व उदयास येत असते. मग प्राचीन कालखंड असेल तर त्या काळातील घडलेल्या घटना व तत्कालीन नेतृत्व मध्ययुगीन काळाचा विचार केला तर अनेक युध्द आणि हिंसा व सुधारणा अशा गोष्टी घडत गेल्या मग काही चांगल्या व काही वाईट पण असतात. यात सहभाग घेणारे कोण होते. फक्त पुरुष मंडळीच नेतृत्व करीत होती असे म्हणता येणार नाही. कारण मध्ययुगाचा इतिहास तपासला तर आपणास रझ्ीया सुलताना या स्त्रीच्या नावाचा उल्लेख करावा लागेल. या शिवाय अनेक आहेत. त्याप्रमाणे आधुनिक कालखंडात तर अनेक महिलांनी प्रत्येक क्षेत्रात सहभाग नोंदवला. मग ती भारतीय स्वातंत्र्याचे आंदोलन असो किंवा 1857 उठाव असो किंवा हैद्राबाद मुक्ती आंदोलन असो वरील अनेक आंदोलनात भारतीय स्त्रीयांनी आपल्या प्राणाची पर्वा न केल्याची अनेक उदाहरणे आहेत. भारतीय स्त्रियांनी उठाव चळवळी, आंदोलने, राजकारण यामध्ये सहभागी होऊन आपलया कामाचा ठसा उमटविला. त्या पैकी इंदिरा गांधीचा उल्लेख करावा लागेल. इंदिरा गांधी अनेक हिंसक आंदोलनात सहभागी झाल्या नसल्या तरी त्यांनी आपल्या कार्य कर्तत्वाने राजकीय क्षेत्रात अजरामर राहिल्या आहेत. त्यामुळे त्यांचे जिवन व कार्य या विषयावर या शोधनिबंधाता विश्लेषण करण्यात आलेले आहे.

*** इंदिरा गांधी अल्पपरिचय :-**

इंदिरा गांधी यांचा या शोधनिबंधात परिचय किंवा त्यांच्या पूर्वायुष्य विषयी माहिती लिहीणे हे मला संयुक्तीक वाटत नाही कारण इंदिरा गांधीनी जवाहरलाल नेहरू सारख्या महान व्यक्तीच्या पोटी जन्म घेतला होता. त्यामुळे इंदिरा गांधी कोणाची मुलगी आहे हे सांगण्याची गरज नाही. पण ही गरज फक्त वाचक वर्गासाठी नाही असे मला वाटते. त्यामुळे त्यांचा अल्पपरिचय देण्याचा मी येथे प्रयत्न केलेला आहे. 19 नोव्हेंबर 1917 रोजी पंडीत जवाहरलाल आणि कमला नेहरू या दाम्पत्याच्या पोटी इंदिरा गांधीचा जन्म झाला. पंडीत जवाहरलाल नेहरूचे वडील मोतीलाल नेहरू त्यांच्या आईचे नाव इंदिराराणी असल्यामुळे पुढे नेहरूनी इंदिरा गांधीचे नाव इंदिरा असे ठेवले. जन्मानंतर त्यांचे प्रारंभीचे जिवन अतिशय वैभव आणि श्रीमंतीत गेले. कारण त्याचे आजोबा मोतीलाल नेहरू यांचा वकीलाचा व्यवसाय त्या काळात अगदी जोरात चालु होता. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाची उत्तम सोय करण्यात आलेली होती. वडील आणि आजोबा यांच्याकडे सातत्याने येणाऱ्या व्यक्ती आणि त्यांच्या घरातील राष्ट्रीय चळवळीने भरलेले वातावरण या सर्व गोष्टींचा त्यांच्या मनावर बालपणीचा परिणाम झालेला होता. त्यामुळे त्याचे बालमन सुध्दा भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात सहभागी होण्यासाठी अतुर झालेले होते. त्याचे उदा. म्हणून

ISBN 978-93-85882-65-4